मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३)अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/अपील/ २००९/४८२८१/अपील क्र.५८९७/०२

सौ. स्मिता सिताराम सकपाळ ---अपीलार्थी
१२- १/१ बी, महाराष्ट्र कॉलनी,
मोराची वाडी, नायगांव, दादर, मुंबई ४०० १४.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त ----- उत्तरवादी
एफ/ दक्षिण , बृहन्मुंबई महानगरपालिका,
परळ, मुंबई ४०० ०१२.

२. जन माहिती अधिकारी तथा वसाहत अधिकारी
(झोपडपट्टी विभाग) एफ/ दक्षिण, बृहन्मुंबई महनगरपालिका,
परळ, मुंबई ४०० ०१२.

*- वि वे च न -*

अपीलार्थीच्या दि. १८/५/२०१० रोजीच्या अपीलाची सुनावणी दि. ६/७/२०१० रोजी घेण्यात आली. कागदपत्रांचे वाचन केले व उपस्थितांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून आले की, अपीलार्थीच्या मुळ अर्जाला प्रथम अपीलात योग्यतो निर्णय देण्यात आलेला आहे. सौ.स्मिता सकपाळ यांना दुसरी सदनिका का अनुज्ञेय नाही याचेहि विवेचन सदर निर्णयात केलेले आहे. त्यामुळे रेकॉर्डला उपलब्ध असलेली माहिती त्यांना देण्यांत आलेली आहे. जर दुसरी सदनिका न देण्याचा निर्णय अपीलार्थीस मान्य नसेल तर संबंधित कायद्याखालीच त्यांनी दाद मागणे योग्य राहिल.

*----आदेश---*

अपील अमान्य करण्यात येत आहे.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक: ०१.१०.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/अपील/नाशिक/ २००९/सीआर/२६०/०२

श्री. दिगंबर संतु सातपुते ------ अपीलकर्ता
रा. चेहडी बु., नाशिक रोड,
ता.जि. नाशिक.

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त ------- उत्तरवादी
नाशिक महानगरपालिका, राजीव गांधी भवन,
नाशिक.

जन माहिती अधिकारी तथा विभागीय अधिकारी
महानगरपालिका नाशिक.

*- वि वे च न -*

अपीलार्थी श्री. दिगंबर संतु सातपुते ,यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०.०४.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक,जि.नाशिक येथे दि. १९.०५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी व अपिलार्थी उपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.५.०८.२००८ रोजी अर्ज करुन खालील नमूद माहिती मागितली होती.

१. सन २००७ चे महापालिका निवडणुकीचे वेळी वॉर्ड क्र. ७० मधील नगरसेविका भारती अंबादास लाजनपुरे हिने दिलेल्या इस्टेटीबाबतचे शपथपत्र.

२. त्यांनी निवडणुकीचे वेळी इस्टेटीबाबतची दिलेली माहिती.

३. त्यांचे रहाते बंगल्यास नळ कनेक्शनला मीटर नाही, बांधकाम कायदेशीर नाही

याबाबतची सविस्तर माहितीची मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी दि. २८/८/२००८ च्या पत्राद्वारे मुद्दा क्र. १ व २ वरील मुद्यावर इस्टेटीबाबतचे शपथपत्र व मालमत्तेचे प्रतिज्ञापत्र व त्यातील तपशील सद्य:स्थितीत निवडणुक विभागाकडे सिलबंद स्वरुपात असल्याने माहिती देता येत नाही. तर मुद्दा क्र. ३ वरील त्यांच्या घराचे बांधकाम अधिकृत असून पाणी कनेक्शन मंजूर असून पाणीवापराचे देयक अदा केलेले आहे अशी माहिती पुरविली.

परंतु योग्य माहिती न मिळाल्याने अपीलार्थीनी प्रथम अपील दाखल केले. त्यावरील झालेल्या बैठकीत प्रथम अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलार्थीस चुकीचे उत्तर दिलेले दिसत आहे. तसेच निवडणुकीच्या वेळी दाखल केलेले प्रतिज्ञापत्र हे सिलबंद आहे म्हणून देता येत नाही हेहि चुकीचे आहे. त्याचप्रमाणे घराच्या बांधकामाच्या प्लॅनसंबंधी कोणासही हवी असलेली माहिती योग्य ती फी भरुन घेऊ शकतो, यात कोणतीही गोपनीयता नाही. त्याचप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी कपाटात सिलबंद असलेले कागदपत्र नंतर नष्ट केल्याचे सांगितले. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अधिनियमाची कोणतीही जाण नाही असे दिसून येते असे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी मत व्यक्त करुन अपीलार्थीस वेळेत माहिती पुरविण्याची सूचना केली. परंतु जन माहिती अधिकारी यांनी निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाली असल्याने सदर माहिती यापूर्वीच नष्ट केली असल्याचे निदर्शनास आणले.

एकूणच याप्रकरणी जन माहिती अधिकारी हे माहिती देताना संभ्रमात पडलेले दिसतात. त्यांना अधिनियमाची व्यवस्थित माहिती दिसून येत नाही. तसेच त्यांनी अपीलार्थीस दिलेले उत्तर योग्यप्रकारे दिलेले नाही. पहिल्यांदा माहिती सिलबंद आहे असे म्हणतात व नंतर माहिती नष्ट केली आहे व माहिती नष्ट करण्यासाठी नियम ४२ चा हवाला देतात. माहिती नष्ट केली असल्यामुळे ती आता देता येणे शक्य नसले तरी माहिती कधी नष्ट करण्यात आली ? अर्जदाराच्या अर्जास उत्तर दिल्यानंतर की आधी ? नंतर नष्ट केली असली तर नष्ट करण्याच्या अगोदर अर्जदारास हवी ती माहिती देता येणे शक्य होते. आधीच नष्ट केली असल्यास माहिती सिलबंद स्वरुपात आहे असे उत्तर कसे दिले. अपिलीय अधिकाऱ्यांनी याची चौकशी करावी व जन माहिती अधिकारी हे कर्तव्यात चुकले असले असे आढळून आले तर त्यांचेविरुध्द प्रशासनिक कारवाई करावी.

*----आदेश---*

अपील निकाली काढण्यात  येत आहे.

उप आयुक्त तथा अपिलीय अधिकारी यांनी  उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ. सुरेश वि.जोशी)

दिनांक: ०१.१०.२०१०

राज्य  मुख्य माहिती आयुक्त

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**क्रमांक-मु.मा.आ/२०१०/३९१९०/तक्रार क्रमांक ७५३/०१**

**श्री. कमलाकर रत्नाकर शेणॉय -----तक्रारदार**
**२/१३, आदिनाथ को.ऑप.हौ.सोसायटी,**
**इली कडूरी स्कूलसमोर, माझगांव, मुंबई ४०० ०१०.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त ----उत्तरवादी**
**ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे युनिट, ठाणे.**

**२.जन माहिती अधिकारी**
**ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे युनिट, ठाणे.**

***---विवेचन---***

श्रीयुत कमलाकर रत्नाकर शेणॉय यांनी आयोगाकडे दि.२/३/२००९ रोजी जी तक्रार सादर केली होती त्याची सुनावणी राज्य माहिती आयुक्त,बृहन्मुंबई यांच्याकडे दि. २२ एप्रिल, २०१० रोजी ठेवण्यात आली होती. मात्र त्यावेळेला तक्रारदारांनी ही केस दुसऱ्या खंडपीठाकडे हस्तांतरित करण्यात यावी अशी विनंती केल्यामुळे सदरील तक्रारीची चौकशी दि. २१/६/२०१० रोजी ठेवण्यात आली होती.

वरील तक्रारीच्या सुनावणीस उपस्थित राहण्यासाठी दि. २/६/२०१० रोजीच्या आयोगाचे पत्र हे दि. ७/६/२०१० रोजी U.P.C. ने पोष्टात दाखल केलेले आहे. अनुपस्थितीबद्दल तक्रारदारांचे कोणतेही पत्र आयोगास प्राप्त झालेले नाही. त्यामुळे तक्रार पुढे चालविण्यात तक्रारदारांचे स्वारस्य दिसून येत नाही. त्याचप्रमाणे तक्रारदार यांनी आयोगाकडे यापूर्वी दि. ८/३/२००८ रोजी केलेल्या द्वितीय अपीलावर राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई खंडपीठ यांनी अपील क्रमांक २००९/२८४७ व २८४८ प्रकरणी दि. १३/७/२००९ रोजी जे आदेश पारित केलेले आहेत ते व दुसऱ्या एका तक्रारीच्या बाबतीत क्रमांक मुमाआ/४०५४५/तक्रार क्रमांक ४६८/०१, दिनांक ३१/१२/२००९

**रोजी मी जे आदेश पारित केलेले आहेत त्या दोन्ही प्रकरणांमध्ये तक्रारदाराने केलेल्या विचाराधीन तक्रारीचा अगोदरच विचार करण्यात आला आहे. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.**

***<u>----आदेश----</u>***

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**दिनांक: ०४.१०.२०१०**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३)अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/अपील/ २००९/४६७९५/अपील क्र.५८२६ /०२

श्री. महेंद्र पाल ---अपीलार्थी
संपतपाल चाळ, कृष्णा नगर, मरोळ नाका,
अंधेरी (पूर्व) मुंबई ४०० ०५९.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (विशेष) ----- उत्तरवादी
के/पूर्व विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका,
आझाद रोड, अंधेरी (पूर्व) मुंबई ४०० ०६९.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इ.व.का)
के/पूर्व विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका,
आझाद रोड, अंधेरी (पूर्व) मुंबई ४०० ०६९.

*- वि वे च न -*

अपीलाचा दिनांक २०/१/२०१०
सुनावणीचा दिनांक २४/६/२०१०
अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी गैरहजर.

अपीलार्थींनी दि. २/३/२००९ च्या अर्जाद्वारे ४ मुद्दयांची मागणी केली. या अनुषंगाने दि. ६/५/२००९ च्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांनी त्यांना असे कळविले की, त्यांनी माहितीशी संबंधित कागदपत्रांचे निरीक्षण करण्यासाठी कार्यालयाला भेट द्यावी व त्यांना आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या प्रती शुल्क भरुन प्राप्त करावयात.

या उत्तराने समाधान न झाल्याने त्यांनी दि. १३/१२/२००९ रोजी प्रथम अपील केले. यानंतर सुध्दा त्यांना माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

अपीलावरील सुनावणीच्या वेळी उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपीलार्थींना ज्या

**कागदपत्रांच्या छायाप्रती हव्या आहेत त्या त्यांना मिळालेल्या नाहीत. तेव्हा याबाबत आयोगाचे असे निर्देश आहेत की, अपीलार्थींना त्यांच्या मागणीनुसार कागदपत्रांच्या छायाप्रती ५ दिवसात उपलब्ध करुन द्याव्यात.**

***----आदेश---***

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**दिनांक: ०४.१०.२०१०**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

क्रमांक-मु.मा.आ/२००९/तक्रार क्रमांक ५९५/०१

श्री. एस.के. नानगिया -----तक्रारदार
७०४, गोल्डन चॅरिएट को.ऑप.हौ.सोसा.
१३३, सेक्टर ६, चारकोप, कांदिवली (पश्चिम)
मुंबई ४०० ०६७.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक ----उत्तरवादी
सहकारी संस्था, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) मुंबई ५१.

२. जन माहिती अधिकारी तथा सहकारी अधिकारी श्रेणी १
सहकारी संस्था, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) मुंबई ५१.

***---विवेचन---***

आयोगाच्या तक्रार क्र. ५९५/०१ मध्ये दि. १२ मार्च, २०१० रोजी दिलेल्या आदेशानुसार डॉ. किशोर मांडे यांनी त्यांचा खुलासा पुढीलप्रमाणे सादर केलेला आहे.

" आपणसंदर्भिय आदेशान्वये जन माहिती अधिकारी डॉ. किशोर मांडे यांनी त्यांच्याच दि. ०८/०७/२०१० रोजी प्रथम अपिलीय प्राधिकारी म्हणून दिलेल्या आदेशाचे अनुपालन १० दिवसात करावे असे आदेश देऊन त्यांच्यावर शास्ती का लावण्यात येऊ नये याबाबतचा खुलासा दि. ३०/३/२०१० पर्यंत प्रत्यक्ष कार्यालयात येऊन सादर करण्याबाबत आदेशित केले आहे.

"वरील आदेशाच्या अनुषंगाने खुलासा सादर करण्यात येतो की, मी डॉ. किशोर मांडे, उपनिबंधक सहकारी संस्था, म्हाडा या पदाचा पदभार दि. ०४/०४/२००८ रोजी स्वीकारलेला आहे. ज्यावेळी मी सदर पदभार स्विकारला त्यावेळेपासूनच किंबहूना त्याहीपूर्वी म्हणजेच तत्कालीन उपनिबंधक श्री. बाजीराव शिंदे यांच्या कालावधीमध्येच उपनिबंधक हे पद अपिलीय अधिकारी म्हणून निश्चित करण्यात आलेले आहे. त्यांच्या कालावधीमध्ये सुरुवातीस उपनिबंधक हे जन माहिती अधिकारी म्हणून कामकाज करत होते. त्यावेळी सहमुख्य अधिकारी/मुंबई मंडळ हे अपिलीय अधिकारी म्हणून काम पहात होते. परंतु वरीलप्रमाणे मी या पदावर रुजू होण्यापूर्वीच उपनिबंधक हे

पद अपिलीय अधिकारी म्हणून निश्चित करण्यात आल्यामुळे या कार्यालयातील सहकारी अधिकारी श्रेणी १ ची दोन्ही पदे त्या त्या विभागासाठी माहिती अधिकारी म्हणून निश्चित करण्यात आली. श्री. नानगिया यांनी उपनिबंधक कार्यालयात दि. ०१/०४/२००८ रोजी माहिती अधिकाराखाली अर्ज केला त्यादिवशी श्री. बाजीराव शिंदे उपनिबंधक पदावर कार्यरत होते. परंतु ते जन माहिती अधिकारी म्हणून कामकाज न करता अपिलीय अधिकारी म्हणून कामकाज करीत होते. मुळातच श्री. नानगिया यांनी जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक असा चुकीचा अर्ज या कार्यालयात दाखल केला होता. तरी देखिल या कार्यालयातील जन माहिती अधिकारी तथा सहकारी अधिकारी श्रेणी १ यांनी श्री. नानगिया यांना दि. १७/०५/२००८ रोजी माहिती दिलेली आहे. सदर माहितीने त्यांचे समाधान न झाल्याने, त्यांनी अपिलीय अधिकारी म्हणूंन माझ्यासमोर अपील दाखल केले होते. सदर अपीलातील सर्व मुद्दयांचा विचार करुन ज्या मुद्दयांबाबत श्री.नानगिया यांना माहिती मिळालेली नव्हती त्या मुद्दयांबाबत १५ दिवसात माहिती देणेबाबत माहिती अधिकारी यांना आदेश दिले होते.

वरीलप्रमाणे वस्तुस्थिती असल्याने, मी या कार्यालयात जन माहिती अधिकारी असण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. त्यामुळे श्री. नानगिया यांना जन माहिती अधिकारी म्हणून माहिती न देण्याच्या मुद्दयांत व पुनः अपिलीय अधिकारी म्हणून स्वतः श्री. नानगिया यांना माहिती देण्याच्या मुद्दयांत कोणतेही तथ्य आढळून येत नसल्याने, व श्री. नानगिया यांनी आयोगाला चुकीची माहिती दिल्याने, आपण दि. १२/३/२०१० रोजी दिलेल्या आदेशात दुरुस्ती होणेस विनंती करीत आहे. तसेच माहिती देण्याबाबत टाळाटाळ किंवा माहिती दडपण्याचा प्रयत्न केलेला नसल्याने, कोणत्याही प्रकारची शास्ती लावण्याबाबतची कारवाई करु नये. कारण मी या कार्यालयात कधीही जन माहिती अधिकारी म्हणून कामकाज केलेले नाही. आपल्या दि. १२/३/२०१० रोजीच्या आदेशान्वये वरीलप्रमाणे खुलासा करीत असून, सदर खुलासा ग्राहय धरावा, ही विनंती. "

हा खुलासा मान्य करण्यात येत आहे व शास्तीचे प्रकरण बंद करण्यात येत आहे.

( डॉ. सुरेश वि.जोशी )

दिनांक: ०४.१०.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३)अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/अपील/ २००८/३०९७६/अपील क्र.३३९२/०२

श्री. अभिषेक अंबुज कासलीवाल ---अपीलार्थी
फ्लॅट १०, ५ वा मजला, पद्म को.ऑप.हौ.सोसायटी,
पेडर रोड, मुंबई ४०० ०२६.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त ----- उत्तरवादी
परिमंडळ ३, मुंबई.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त
मध्य नियंत्रण कक्ष, मध्य विभाग, बावळा कंपाऊंड,
भायखळा (पूर्व) मुंबई.

*- वि वे च न -*

श्री. अभिषेक अंबुज कासलीवाल, मुंबई यांनी दि. २६ नोव्हेंबर, २००७ च्या अर्जान्वये वरळी पोलीस स्टेशनचा सीआर क्र. ७५/०६ (जुना कुलाबा पोलीस स्टेशन सीआर क्र. ५१/०६) मध्ये पोलीस स्टेशन डायरीतील नोंदी व त्या अनुषंगाने करण्यात आलेले नोटींग इ. प्रतीची मागणी केली आहे.

सदर अर्जाला दि. १०/१२/२००७ च्या पत्रान्वये अपीलार्थीस उत्तर देण्यात आलेले आहे. तद्नंतर प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी त्यांचेकडे दाखल झालेल्या दि. २१/१/२००८ रोजीच्या प्रथम अपीलाच्या अनुषंगाने दि. ८/२/२००८ रोजी आदेश पारित केलेला आहे. ज्यात अर्जदारांची माहितीची विनंती पुढील कारणासाठी फेटाळण्यात आली आहे.

सदर आदेशात प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी केंद्रिय माहित आयोग यांचे निकालाचा संदर्भ दिलेला आहे. (संदर्भ क्र. Cic/80/A/2006/4004 दि. ३० जून २००६) सदर निर्णयाप्रमाणे "ज्या गुन्हयाचा तपास चालू असेल किंवा खटला न्यायालयात चालू अथवा दाखल असेल अशा गुन्हा अगर

खटल्यामधील माहिती , माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम 8(1) (h) व 8(1)(g) अन्वये नाकारता येईल. "

या आदेशाने व्यथित होऊन अपीलार्थीनी दि. २४/३/२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. त्याची सुनावणी दि. २९/११/२००८ रोजी घेण्यात आली. त्या सुनावणीस अपीलार्थी तर्फे त्यांचे वकील व सर्व संबंधित जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अपीलार्थीनी दाखल केलेले द्वितीय अपील व सुनावणीच्यावेळी सादर करण्यात आलेली माहिती विचारात घेता प्रथम अपिलीय प्राधिकारी व केंद्रीय माहिती आयुक्त, नवी दिल्ली यांनी दिलेल्या आदेशाशी मी सहमत आहे.

त्याचप्रमाणे मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचे क्रिमीनल अप्ली.नं. १०३०/२००८ (श्रीमती.रंजनाबाई किसनसिंग धुमाळे विरुध्द महाराष्ट्र श्ंासन) मधील निकालावर आधारित पत्रक पोलीस महासंचालक यांनी काढले आहे ते पुढीलप्रमाणे ---

" मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठापुढे एका क्रिमीनल याचिकेच्या सुनावणीच्या वेळी संबंधित तपासी अधिकाऱ्याने तपासाच्या कार्यवाहीचा रोजनामा (केसडायरी) तक्रारदाराला माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत देण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. या प्रकरणातील सहायक पोलीस अभियोक्ता यांनी भारतीय फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम १७२ नुसार फक्त संबंधित आरोपीला अशा तपासाची कागदपत्रे (केसडायरी) देता येत नसल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले.

याबाबत न्यायालयाने सूचित केले की, भारतीय फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ मधील १७२ नुसार खटल्यातील तपासाच्या कार्यवाहीचा रोजनामा (केसडायरी) मॅजिस्ट्रेटला केव्हाही मागवता येईल परंतु त्याचा पुरावा म्हणून त्यास उपयोग करता येणार नाही. मात्र जेव्हा तपासी अंमलदार आपली आठवण ताजी करण्यासाठी त्याचा उपयोग करील तेव्हा तेवढयाच भागाबद्दल कोर्ट किंवा विरोधी पक्षास खंडन करण्याकरीता कलम १६१ अन्वये किंवा पुरावा अधिनियम १४५ अन्वये उपयोग करता येईल म्हणजेच कलम १७२ च्या पोट कलम (३) नुसार आरोपी किंवा त्यांच्या हस्ताकांना अशा केसडायरी मागता येणार नाहीत किंवा त्यांना त्या पाहता सुध्दा येणार नाहीत. कारण त्या न्यायालयांस सादर कराव्या लागणार आहेत. अशा केसडायरी तक्रारीवर किंवा खाजगी

इसमास निश्चितपणे देता येणार नाहीत कारण पोट नियम (३) नुसार घालण्यात आलेले निर्बंध फोल ठरतील व या केस डायरीबाबत असलेली गोपनियता कोणीही म्हणजे आरोपीसह चातुर्याने भंग करु शकेल. उदा. एखादा खाजगी इसम अशा केस डायरी मिळण्यासाठी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये अर्ज करेल व त्यानंतर ती माहिती/ कागदपत्रे आरोपीस उपलब्ध करुन देईल जेणेकरुन दिन प्रतिदिन केलेला तपास संपूर्णपणे उघड होईल. त्यामुळे या प्रकरणातील तपासी अधिकाऱ्याने अवलंबलेली पध्दत टोकाची व भारतीय फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ मधील कलम १७२ चे उल्लंघन करणारी असल्याचे मत मा. उच्च न्यायालयाने व्यक्त केले आहे. तरी खालील सर्व घटकप्रमुखांनी माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीचा दुरुपयोग करुन अशा प्रकारे मागण्यात आलेली तपासासंबंधीची कागदपत्रे संबंधित न्यायालयात दोषारोप पत्र सादर करेपर्यंत फक्त न्यायालयास उपलब्ध करुन द्यावीत व आरोपी किंवा इतर कोणासही न देण्याची दक्षता घेण्याच्या सूचना सर्व संबंधितांना कृपया द्याव्यात. "

वरील पत्रकातील निर्देश सुध्दा आयोगास योग्यच वाटतात. कारण ते हायकोर्टाच्या निर्णयावर आधारित आहेत व हायकोर्टाच्या निर्देशाप्रमाणे दिलेले आहेत.

सुप्रीम कोर्टानी (बेंच ठक्कर एम.पी.(J) श्री. बी.सी. रे(J) ) 1989 AIR 144 1988 SCR Supl (3) 524 1989 SCC Supl. (I) 622 JT 1988 (4) 143 1988 SCALE (2) 1001 या केसमध्ये दि. ४/१०/१९८८ रोजी (मुकुंदलाल विरुध्द युनियन ऑफ इंडिया) प्रॉसिक्युशन व केस डायरीच्या संदर्भात पुढीलप्रमाणे निकाल दिलेला आहे.

**The case diary contains not only the statements of witnesses recorded under s. 161 cr. p.c. and the site plan or other documents prepared by the Investigating Officer, but also reports or observations of the Investigating Officer or his superiors. These reports are of a confidential nature and privilege can he claimed thereof. Further, the disclosure of the contents of such reports cannot help any of the parties to the litigation as the report invariably contains the opinion of such officers and their opinion is inadmissible in evidence."**

**The public interest requirement from the stand point of the need to**

**ensure a fair trial for an accused is more than sufficiently met by the power conferred on the court, which is the ultimate custodian of the interest of justice and can (PG NO 530) always be trusted to be vigilant to ensure that the interest of accused persons standing the trial, is fully safeguarded. This is a factor which must be accorded its due weight. There would be no prejudice or failure of justice to the accused person since the court can be trusted to look into the police diary for the purpose of protecting his interest. Therefore, the public interest requirement from the perspective of safeguarding the interest of all persons standing trial is not compromised. On the other hand the public interest requirement from the perspective of enabling the investigation agency to investigate the crime against the society in order that the interest of the community to ensure that a culprit is traced and brought to book is also safeguarded. The argument inspired by the observations in Raj Narain's case (1975) 3 S.C.R. p. 333 and S.P. Gupta's case (1982) 2 S.C.R. p. 365 (at pp. 622, 624) in the context of claim for privilege in regard to section 123 of Evidence Act, which have no direct bearing, is also effectively answered in the light of the foregoing discussion as the 'Public Interest' aspect is also taken care of. In the ultimate analysis, it is not possible to sustain the plea of the petitioners, which is rooted in the mistrust of the court itself, that the provision is unreasonable and arbitrary. There is also another dimension of the issue. Section 172 embodies a composite scheme. The duty cas under Clause (1) and the rider added by Clause 1(3) cannot be struck down in isolation whilst retaining Clause (1). The legislature in its wisdom has cast this obligation only subject to the rider. Clause (3) cannot be viewed in isolation. Under the circumstances, we concur with the view of the High Court and repulse the challenge. These are the reasons which impelled us to dismiss the petitions.**

त्यामुळे फौजदारी संहितेचे कलम १७२ व माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम

**8 (1) (h) च्या तरतुदीचा एकत्रित विचार केला असता केसडायरी दिल्याने गुन्हेगाराच्या प्रॉसिक्युशनवर परिणाम होऊ शकतो हे अपिलीय अधिकारी यांचे विधान सयुक्तिक वाटते. याबाबतीत अपीलार्थींना हेहि सांगावेसे वाटते की, कोर्टाला केस डायरी मागविण्याचे पूर्ण अधिकार आहेत व केस चालू असताना अर्जदाराचे मुद्दे पटले तर मा.कोर्ट केव्हाहि केसडायरी त्यांचेपुढे सादर करण्याचे आदेश देऊ शकते. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येतो.**

***----आदेश---***

**अपीलार्थींचे अपील फेटाळण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**

**दिनांक: ०५.१०.२०१०** **राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक २०/१०

श्री.विजयकुमार नामदेव काकडे -----अपीलार्थी
रा. चिखली, घोडसगांव,
ता. मुक्ताईनगर, जि. जळगांव.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी ----उत्तरवादी
गोदावरी फाऊंडेशन गोदावरी कॉलेज ऑफ इंजिनियरिंग,
जळगांव, जि. जळगांव.

२. जन माहिती अधिकारी
गोदावरी फाऊंडेशन गोदावरी कॉलेज ऑफ इंजिनियरिंग,
जळगांव, जि. जळगांव.

***---विवेचन---***

अपीलांचा दिनांक १५/०६/२००९
सुनावणीचा दिनांक ०५/०३/२०१०
अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थी श्री. विजयकुमार नामदेव काकडे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १५/०६/२००९ रोजी द्वितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर जळगांव येथे दि. ५/३/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २३/०३/२००९ रोजी अर्ज करुन खालील माहिती मागितली होती.

१. एम.एच.टी सीईटीच्या नेमणूकीच्या पत्रानुसार संस्थेने सर्व मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून किती फी घेतली त्या विद्यार्थ्यांची नांवे व पत्ता इत्यादी.

२.	शासनाकडून मिळणारी शिष्यवृत्तीचे वाटप मागासवर्गीयांना कसे केले त्याचा तपशील.

३.	शिष्यवृत्ती देणे बाकी असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या, रक्कम इत्यादी.

४.	शिष्यवृत्ती वाटप राहिले असल्यास त्याचा तपशील वगैरे १८ मुद्दयांवर माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक गोदावरी इंजिनियरिंग कॉलेज जळगांव यांनी त्यांच्या दि. २२/५/२००९ च्या पत्राद्वारे अपीलार्थीस या कॉलेजला शासनाने कोणतेही अनुदान किंवा वित्तपुरवठा होत नाही त्यामुळे संस्थेस माहिती अधिकार २००५ हा लागू होत नाही. त्यामुळे अपीलार्थीस माहिती देणे बंधनकारक नसल्याचे कळविले. प्रथम अपिलावरहि हे उत्तर देण्यांत आले. त्याविरोधात अपीलार्थीनी द्वितीय अपील दाखल केले. सुनावणीच्या वेळी अपीलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. परंतु जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्या वेळी असे सांगितले की, जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस अभियांत्रिकी महाविद्यालय हे पब्लिक ॲथॉरिटी नाही. ते विनाअनुदानित आहे त्यामुळे त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा लागू नाही.

मागासवर्गीयांच्या शिष्यवृत्त्यांसंबंधीचा पैसा हा शासनाकडूनच उपलब्ध होत असल्यामुळे त्यासंदर्भात सांख्यिकी माहिती ही अपीलार्थीस देण्यात यावी असे निर्देश देण्यात येत आहेत.

---*आदेश*---

अपील मान्य करण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी हे आदेश मिळाल्यापासून १० दिवसांत अपीलार्थीस माहिती देण्यात यावी.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक: ०५.१०.२०१०

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**क्रमांक-मु.मा.आ/२०१०/२६६०/तक्रार क्रमांक १५५०/०१**
**क्रमांक मुमाआ/२०१०/४७१९६/अपील क्र ५७९८/०२**

**श्री.चेतन कोठारी -----तक्रारदार**
**५२, ओशियानिक अपार्टमेंट,**
**डॉ. राजाबली पटेल लेन, ऑफ बी.देसाई रोड,**
**मुंबई ४०० ०२६.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह सचिव ----उत्तरवादी**
**(शालेय शिक्षण) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**२.जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

***---विवेचन---***

श्रीयुत चेतन कोठारी यांनी दि. २८/८/२०१० रोजी आयोगास पत्र लिहून आयोगाच्या अपील क्र. ५७९८/०२ मधील आदेशाचे पालन झालेले नाही असे आयोगाच्या निदर्शनास आणल्यावरुन त्यासंबंधीची सुनावणी दि. ७/१०/२०१० रोजी घेण्यांत आली. त्यावेळेला तक्रारदार, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित होते.

सुनावणीच्या वेळेला जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी आयोगाच्या असे निदर्शनाला आणले की, तक्रारदारांनी ट्रेनेबल गव्हर्नमेंट सर्व्हंट्स विषयी माहिती विचारलेली होती. मात्र अशी कुठचीही माहिती मंत्रालयात नसल्यामुळे त्यांना संबंधित शिक्षणाधिकाऱ्यांकडे संपर्क साधण्यास कळविण्यात आलेले होते.

तक्रारदारांनी सुनावणीच्या वेळेला हे स्पष्ट केले की, त्यांना ट्रान्स्फरेबल गव्हर्नमेंट सर्व्हंटस्च्या बाबतीत माहिती पाहिजे. त्यामुळे दोन्ही पक्षाशी चर्चा करुन असे ठरविण्यात आले की, ट्रान्स्फरेबल

शासकीय सेवकांच्या मुलांना खाजगी शाळेत ॲडमिशन घेण्यासंबंधी स्कूल कोड मध्ये असलेल्या तरतुदी  तसेच यासंबंधी शासनाने कांही शासन निर्णय किंवा परिपत्रक काढले असेल तर त्याच्या प्रती  ५ दिवसांच्या आत स्पीड पोष्टने तक्रारदारांस विनामूल्य पाठविण्यात याव्यात.

***----आदेश----***

तक्रार व अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)

दिनांक: ०७.१०.२०१०

राज्य  मुख्य माहिती आयुक्त

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**क्रमांक-मु.मा.आ/२००९/४०९७३/तक्रार क्रमांक ३७६/०१**

**श्री. संदिप वसंत बने -----तक्रारदार**
**ए-१/ शिवदर्शन, क्रॉस सयानी रोड,**
**प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त ----उत्तरवादी**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/उत्तर विीाग**
**हरिश्चंद्र येवले मार्ग, दादर (पश्चिम) मुंबई ४०० ०२८.**

**२.जन माहिती अधिकारी तथा वसाहत अधिकारी**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/उत्तर विीाग**
**हरिश्चंद्र येवले मार्ग, दादर (पश्चिम) मुंबई ४०० ०२८.**

***---विवेचन---***

**श्री. सदिप वसंत बने , रा. मुंबई यांनी आयोगाकडे दि. १६ मे, २००९ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १८(१) अन्वये तक्रार सादर केली आहे. श्री. संदिप बने यांनी दि. ४/३/२००९ रोजी आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले होते. त्यावर माझ्या दि. २३/४/२००९ रोजीच्या आदेश क्रमांक मुमाआ/२००९/३९२५५/अपील क्रमांक ४२९७/०२ अन्वये जन माहिती अधिकारी यांना आदेश मिळाल्यापासून अपीलार्थीस १० दिवसात माहिती द्यावी व त्यांचेवर उक्त अधिनियमाच्या कलम २० अन्वये शास्तीची कारवाई का करु नये याबाबत लेखी खुलासा दि. ११ मे, २००९ रोजी आयोगासमोर समक्ष सादर करावा, असे निर्देश देण्यांत आले होते.**

**जन माहिती अधिकारी यांनी दि. ११ मे, २००९ व दि. ८ जून, २००९ रोजी उपस्थित राहून सादर केलेला खुलासा लक्षात घेऊन मी दि. १५ जून, २००९ रोजी अपील क्रमांक ४२९७/०२ प्रकरणी अर्जदारास माहिती देण्यात आलेली असल्यामुळे आता शास्तीबाबत आदेश नाहीत असा निष्कर्ष नोंदवून अपील निकाली काढलेले आहे. अपीलार्थी श्रीयुत संदिप बने यांनी दि. १६ मे,**

**२००९ रोजी दाखल केलेली तक्रार व त्यांनीच दाखल केलेल्या दि. ४/३/२००९ च्या अपीलाचा (अपील क्रमांक ४२९७/०२) विषय एकच असल्याचे दिसून येते. दि. १५ जून, २००९ रोजी अपील क्र. ४२९७/०२ प्रकरणी पारित केलेले आदेश लक्षात घेता विचाराधिन तक्रार अर्जावर वेगळी कार्यवाही आवश्यकता नाही. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.**

***----आदेश---***

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**(डॉ. सुरेश वि.जोशी)**

**दिनांक: ०८.१०.२०१०** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३)अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/अपील/ २००९/४१८९४/अपील क्र.४८६७/०२

श्री. गोपाल शर्मा ---अपीलार्थी
फ्लॅट नं. ०९, बी, तळमजला,
ओम सतनाम को.ऑप.हौ.सोसायटी लि.
३ रा रस्ता, खार (पश्चिम) मुंबई ५२.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त झोन-९ ----- उत्तरवादी
पोलीस उप आयुक्त झोन ९ यांचे कार्यालय,
हिल रोड, वांद्रे (प) मुंबई ५०.
२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त
पश्चिम प्रादेशिक विभाग, हिल रोड,
वांद्रे (पश्चिम) , मुंबई ४०० ०५०

*- वि वे च न -*

श्रीयुत गोपाल शर्मा यांनी आयोगाकडे दि. १ जुलै २००९ रोजी दाखल केलेल्या अपीलाची सुनावणी दि. २०/१०/२००९ रोजी घेण्यांत आली. त्यावेळेला अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते. सुनावणीच्या वेळेला हे स्पष्ट झाले की, अपीलार्थीस पोलीस डायरी सोडून इतर सर्व माहिती देण्यांत आलेली आहे.

पोलीस डायरीच्या संदर्भात चार्जशिट दाखल होईपर्यंत पोलीस डायरी देण्यात येऊ नये असे निर्देश सर्व पोलीस स्टेशनना डायरेक्टर जनरल ऑफ पोलीस कार्यालयाने मुंबई हायकोर्टाच्या औरंगाबाद खंडपीठाच्या निर्देशानुसार दिलेले आहेत. त्यामुळे तपास चालू असेपर्यंत पोलीस डायरी न देण्याचा निर्णय हा योग्यच वाटतो. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

*---आदेश---*

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
दिनांक: ०८.१०.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक : मुमाआ २००९/ अपील क्र.४२९६ व ४२९८/०२**

**श्री. लेस्ली अल्मेडा, कासा अल्मेडा** **------- अपीलकर्ता**
**फ्लॅट १०३, १ सेंट जोसेफ रोड, ऑफ सेंट पॉल रोड,**
**वांद्रे (प), मुंबई ४०० ०५०**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा** **-------- उत्तरवादी**
**जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (३), गृहनिर्माण भवन,**
**तळमजला, कक्ष क्र. ६९, वांद्रे (पूर्व),**
**मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उपनिबंधक, सहकारी संस्था, अेच/पश्चिम विभाग, सहकार बाजार इमारत,**
**४ था मजला, रेल्वे स्टेशनसमोर, वांद्रे (प),**
**मुंबई ४०० ०५०.**

**---विवेचन ---**

अर्जदार श्री.लेस्ली अल्मेडा यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ३.०३.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. ७.११.२००८ रोजी अर्ज करुन सॉलसेट कॅथॉलिक सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. ही संस्था सहकार कायद्यांतर्गत नोंदणीकृत सहकारी संस्था आहे. सदर संस्थेचा कारभार महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्या खालील नियम १९६० तसेच संस्थेच्या मंजूर उपविधीतील तरतुदीनुसार आणि शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेली परिपत्रके यानुसार चालत नसल्याबाबत एकूण ९ मुद्यावर माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही.यामुळे अपीलकाराने दि. २९.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि. ७.०७.२००८ रोजी सुनावणी आयाजित केली अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती पुरविण्यात यावी असे दि. ३०.०९.२००९ रोजी आदेश पारित केले. त्यानंतरही जन माहिती अधिकारी यांनी अपीलकारास माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि. ८.०६.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे् ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन सॉलसेट कॅथालिक सहाकारी गृहनिर्माण संस्थेचा कारभार नियमानुसार चालत नसल्याबाबत अपीलकाराची तक्रार असून विविधी मुद्यावर माहिती मागितली आहे. अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती उपलब्ध करुन द्यावी असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी, प्रथम अपीलावर आदेश पारित केले आहेत. त्यानंरही जन माहिती अधिकारी यांनी अपीलकारास माहिती पुरविली नाही. सदर जन माहिती अधिकारी यांची कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी सुनावणीच्या वेळीच जन माहिती अधिकारी यांनी १५ दिवसांचे आत अपीलकारास माहिती पुरवावी असे आदेश देण्यात आले.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: ०१.१०.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**क्रमांक : मुमाआ २०१०/४३१६०/त. क्रं. ६४६/०१**

**श्री. नैनेश सुरेश डोळस,** **------ तकारकर्ते**
**जी/२, अंजली सोसायटी, रवी इंडस्ट्रियल कंपाऊंड,**
**पाचपाखाडी, ठाणे (प), जि.ठाणे**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा** **-------- उत्तरवादी**
**कार्यकारी अभियंता, भातसा कालवा विभाग क्र.१,**
**शहापूर जि.ठाणे.**

**अवर सचिव (मो प्र.१),**
**जलसंपदा विभाग, मंत्रालय,**
**मुंबई ४०० ०३२.**

**अधीक्षक अभियंता, ठाणे पाटबंधारे मंडळ,**
**सिंचन भवन, ३ रा मजला, ठाणे ३,**
**ठाणे (पूर्व).**

**---विवेचन ---**

श्री नैनेश डोळस, ठाणे यांनी दि. २१.०५.२००९ रोजी लघुपाटबंधारे विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे माहितीचा अर्ज सादर केला. सदर माहिती अर्जात भातसा कालवा क्र.१, शहापूर (ठाणे) या प्रकल्पाविषयीची माहिती मागितलेली होती.

जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव (मोठे प्रकल्प) जलसंपदा विभाग, मंत्रालय यांनी श्री.डोळस यांचा माहितीचा अर्ज दि. ३.०६.२००९ च्या पत्रान्वये अधीक्षक अभियंता, ठाणे पाटबंधारे मंडळ, ठाणे यांचेकडे पाठविला.

ठाणे पाटबंधारे, मंडळ ठाणे या कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांनी श्री.डोळस यांचा अर्ज कार्यकारी अभियंता, भातसा कालवा विभाग क्र.१, शहापूर,जि.ठाणे यांचेकडे दि. २२.०६.२००९ रोजी पाठविला.

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता भातसा कालवा विभाग क्र.१ यांनी श्री.डोळस यांना दि. १५.०९.२००९ रोजी रजिस्टर पोस्टाने माहिती पाठविण्यात आली.

श्री.डोळस यांनी राज्य माहिती आयोगाकडे दि. २४.०८.२००९ च्या पत्रान्वये तक्रार दाखल केली असून त्यांनी दाखल केलेल्या माहिती अर्जास उत्तर दिले नाही असे सदर तक्रारीत नमूद केले आहे.अर्जदाराच्या तक्रार अर्जाबाबत कार्यकारी अभियंता भातसा कलवा विभाग क्र.१, शहापूर यांनी पुढीलप्रमाणे खुलासा केला आहे.

" वरील संदर्भिय पत्र क्र.२ नुसार श्री.नैनेश डोळस रा.पाचपाखडी, ठाणे (प) यांनी मौजे खातिवली ता.शहापूर (ठाणे) येथील मध्य रेल्वे वरील बॉक्स कल्वर्टच्या दोन्ही बाजूस पाणी साठते व त्याबाबत काही योग्य ती उपाय योजना

व्हावी याबाबत पत्र दिले होते. त्यास सुयोग्य उत्तर या कार्यालयाचे पत्र क्र.भाकावि-१/प्रशा-२/६/१५३९/दि.२४.०३.२००९ नुसार श्री.डोळस यांना पाठविण्यांत आले. तद्नंतर केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत काही मुद्दे उपस्थित केले. त्यासही या कार्यालयाचे पत्र क्र.भाकावि -१/प्रशा २/६/५३६२/०९ दि. १५.०९.२००९ नुसार उत्तर श्री.डोळस यांना रजिस्टर पोष्टाने रवाना करण्यात आले आहे.

निमस्वाक्षरी करणाऱ्यांनी सदर जागेची पाहणी स्वत: दि. ३.०७.२०१० रोजी केली आहे. श्री डोळस नैसर्गिक नाल्यास मध्ये रेल्वेने पाणी पलीकडे जाण्यासाठी जो दोन धुऱ्याचा बॉक्स कल्वर्ट तयार केला आहे. अशा रेल्वेच्या अखत्यारित बाबी बाबत जलसंपदा विभागास नैसर्गिक नाला बंदस्ति करणे व रस्ता तयार करणे बाबत सूचवित आहेत हे या विभागाच्या कार्यकक्षच्या बाहेर आहे. पावसाळयात सदर बॉक्स कल्वर्टच्या दोन्ही बाजूस पाणी असते. त्यामुळे रानटी वनस्पती वाढते व रहदारी करता येत नाही. असा त्यांचा आक्षेप आहे. वास्तविक सदर बॉक्स कल्वर्टची निर्मिती नैसर्गिक नाल्याचा विसर्ग रेल्वे मार्गाच्या पलीकडे जाण्यासाठभ करण्यात आली आहे व रेल्वेने खातीवली ग्रामस्थांसाठी बॉक्स कल्वर्टच्या पलीकडे (वासिंद स्टेशनकडे) रेल्व ट्रॅकवर रेल्वेगेट रहदारीसाठी ठेवलेला आहे. तो सदर जागेपासून सुमारे १०५ मिटरच्या अंतरावर आहे. त्यामुळे श्री.डोळस यांची मागणीच अवास्तव व अनावश्यक आहे व त्यांचे मागणीस विरोध करणारे पत्रही खातीवली ग्रामपंचायत यांनी दि. १८.१२.२००९ रोजी दिले आहे.

नैसर्गिक नाल्याची निर्मितीच पावसाचे पाणी, गावातील सांडपाणी वाहून जाण्यासाठी आहे त्याच नाल्यात उन्हाळी शेतीसाठी सोडलेले लघुचारीतील पाणी शेतामधुन काही प्रमाणात येत असते. पाणी उताराकडे जाणे हे नैसर्गिक आहे. नाला मोठा आहे विसर्गवहनाच्या प्रयोजनातून नाला व बॉक्स कल्वर्ट आवश्यक आहेत. बॉक्स कल्वर्ट रेल्वेच्या अखत्यारित येत असल्यामुळे जलसंपदा विभाग याबाबत हस्तक्षेप करु शकत नाही. "

वरील खुलासा पाहता अर्जदाराच्या साध्या तसेच माहिती अधिकारातील अर्जांना प्रत्यक्ष पाहणी करुन माहिती देण्याचा प्रयत्न जन माहिती अधिकारी यांनी केलेला दिसतो. अर्ज मिळाल्यावर जागेची प्रत्यक्ष पाहणी करुन सविस्तर उत्तर दिले असल्याने माहितीसाठी विलंब लागला तो क्षमापित करण्यात येत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: ०१.१०.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक : मुमाआ २००९/ अपील / नाशिक/ सी आर १२१२/०२**

**श्री. अमोल प्रकाश ठाकूर,** **------- अपीलकर्ता**
**११ कौस्तुभ स्टेट बँक कॉलनी,**
**पाचोरा,जि.जळगांव**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी** **-------- उत्तरवादी**
**अनुसुचित जमाती, प्रमाणपत्र तपासणी समिती,**
**कश्मिरा इमारत, औरंगाबाद.**

**जन माहिती अधिकारी**
**अनुसुचित जमाती, प्रमाणपत्र तपासणी समिती,**
**कश्मिरा इमारत, औरंगाबाद.**

## ---विवेचन ---

श्री अमोल प्रकाश ठाकूर, पाचोरा जि.जळगांव यांनी दि. २९.०८.२००७ च्या माहितीच्या अर्जान्वये श्री पंकज प्रमोद ठाकूर यांचे प्रकरणी अनुसूचित जमाती प्रमाणपत्र त्रिसदस्त्रीय समितीने दिलेल्या निकालाची प्रत, मुलाखत पत्रिका, दक्षता पथकाचा चौकशी अहवाल व दक्षता पथकाने नोंदविलेल्या जबाबाची प्रत इत्यादि माहिती मागितली होती. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने संशोधन अधिकारी तथा जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे दि. १८.०९.२००७ चे पत्रान्वये एकूण रु. ८०/- इतकी रक्कम भरणा करण्याबाबत कळविले. सदर पत्रात त्रिसदस्त्रीय समितीने दिलेल्या निकालाची सत्यप्रत देता येणार नाही असे देखील कळविले. सदर निकालाची प्रत का देता येणार नाही याचा खुलासा करावा म्हणून दि. १७.१०.२००७ राजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने पुन्हा संशोधन अधिकारी यांनीच रु. २२/- इतकी रक्कम भरणा करावी म्हणून दि. ६.१२.२००७ रोजी कळविलेले आहे.

दि.१३.१२.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी दि. २६.११.२००९ रोजी नाशिक येथे आयोजित करण्यात आली होती. त्या सुनावणीस अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी गैरहजर होते.

अपीलार्थीने श्री.पंकज प्रमोद ठाकूर या त्रयस्थ पक्षाची माहिती मागविली आहे. जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती औरंगाबाद यांनी दोन वेळा अनुक्रमे रु.८०/- व रु.२२/- इतकी रक्कम भरण्याबाबत कळविले आहे.

त्रिसदस्यीय समितीने दिलेल्या निकालाची प्रत अर्जदारास विनाशुल्क देण्यात यावी असे निर्देश जन माहिती अधिकारी यांना देण्यात येत आहेत. अर्जदाराने दि. १९.१०.२००७ रोजी जे प्रथम अपील केले आहे त्यावर त्या अधिकाऱ्यांनी सुनावणी देऊन निर्णय घेणे आवश्यक होते. त्याऐवजी जन माहिती अधिकारी यांनीच अर्जदारास आणखी शुल्क भरण्याचे पत्र पाठविले. हे सर्वस्वी चुकीचे आहे. अपीलीय अधिकारी यांना त्याबद्दल समज देण्यात येत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**
**संबंधितांनी उपरिनिर्दीष्ट कार्यवाही करावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: ०१.१०.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक : मुमाआ २००९/ अपील क्र.४३६५/०२**

**श्री. लेस्ली अल्मेडा, कासा अल्मेडा** **------- अपीलकर्ता**
**फ्लॅट १०३१, सेंट जोसेफ रोड, ऑफ सेंट पॉल रोड,**
**वांद्रे (प), मुंबई ४०० ०५०**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा** **-------- उत्तरवादी**
**जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, गृहनिर्माण म्हाडा इमारत,**
**तळमजला, कक्ष क्र. ६९, वांद्रे (पूर्व),**
**मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उपनिबंधक, सहकारी संस्था, एच/पश्चिम विभाग, सहकार बाजार इमारत,**
**४ था मजला, रेल्वे स्टेशनसमोर, वांद्रे (प),**
**मुंबई ४०० ०५०.**

**---विवेचन ---**

अपीलकार श्री.लेस्ली अलमेडा यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७.०३.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १८.१२.२००८ रोजी अर्ज करुन सॉलसेट कॅथॉलिक सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.४२, सेंट ॲन्डयुज रोड, बांद्रा जिमखाना,बांद्रा (प), मुंबई येथील संस्थेबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी विहीत कालावधीत माहिती दिली नसल्याने अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ४.०२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपीलावर दिनांक १०.०२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकारास कार्यालयात उपलब्ध असलेली संबंधित संस्थेची धारीका निरीक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यात यावी असे दिनांक २७.०२.२००९ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आदेश पारित केले. त्यानंतरही जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकारास माहिती दिली नसल्याने व्यथित होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय  अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक २८.०५.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी हजर होते. अपीलकार अनुपस्थित होते. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकाऱ्यांचे म्हणणे ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकारात अर्ज करुन सॉलसेट कॅथॉलिक सहकारी गृहनिर्माण संस्था, बांद्रा या संस्थे संदर्भात झालेल्या पत्र व्यवहाराच्या माहितीची मागणी केली होती. कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती वेळोवेळी अपीलकारास दिलेली होती. परंतु संस्था स्तरावरील माहिती मिळत नसल्यामुळे ती अपीलकारास उपलब्ध करुन देता आली नाही असे जन माहिती अधिकारी यांनी व्दितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी आयोगास लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले.

ज्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना शासनाकडून अर्थसहाय्य दिले जात नाही अशा संस्थांना माहिती अधिकार अधिनियम लागू होत नाही असे मा.उच्च न्यायालय खंडपीठ, नागपूर यांनी दिलेल्या निर्णयाचा अहवाल ती संस्था माहिती उपलब्ध करुन देत नाही. तरी सुध्दा कार्यालयाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७८ अन्वये व्यवस्थापक समिती बरखास्त केलेली आहे व संस्थेतील प्रशासकांच्या नेमणूकीची कार्यवाही करणे चालू आहे. असेही जन माहिती अधिकारी यांनी व्दितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी दिलेल्या लेखी अहवालात नमूद केले आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देत आहे की, सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी संस्थेविरुध्द केलेल्या कार्यवाहीची माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपीलकारास कळवावे.

**आदेश**

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: ०१.१०.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक : मुमाआ २००९/४६६५५/अपील. क्रं. ५६००/०२**

**श्री. आर.पी.यजुर्वेदी, ------ अपीलकर्ता**
**३०२, अ नवआसावरी सोसायटी, १८२ जे बी नगर,**
**अंधेरी पूर्व, मुंबई ४०० ०५९**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी -------- उत्तरवादी**
**सहआयुक्त (मुख्यालय), आयुक्त, अन्न व औषध प्रशासन,**
**वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पू)**
**मुंबई ४०० ०५१**

**जन माहिती अधिकारी**
**सहायक आयुक्त (मुख्यालय), आयुक्त, अन्न व औषध प्रशासन,**
**वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पू)**
**मुंबई ४०० ०५१**

**---विवेचन ---**

श्री आर.पी.यजुर्वेदी यांनी जन माहिती अधिकारी अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्या कार्यालयाकडे दि. २५.०५.२००९ च्या माहिती अर्जान्वये एकूण पाच मुद्यांबाबतची माहिती मागविलेली होती.

तु मुद्दे खालीलप्रमाणे आहेत:-

"a) Copy of the Agreement w r t tender awarded for AHU system for Microbiolohy at DCL lab Mumbai in year 2008.

b) Copy of the tender w r t above subject clearly specifying the Terms and Conditions as part of the Tender signed received and entered in to between awarded party and awarder ( GO Maharashtra).

c) Provide the certified Xerox copies of the above documents.

d) Provide all the Documents and files for inspection under intimation to us telephonically within 15 days of the receipt of this application for verification and Xeroxing and certified copy supply to us as info.

e) Copy of the order of the Govt of Maharashtra that clearly defines who constitutes the Govt of Maharashtra in FDA state Administration like Designation and Authority."

सदर माहितीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर ती माहिती अर्जदारास विहित कालावधीत देण्याच्या अनुषंगाने सहायक संचालक औषध नियंत्रण प्रयोगशाळा मुंबई यांच्याकडे दि. २५.०५.२००९ च्या पत्रान्वये सदर माहितीचा अर्ज पाठविला. विहित वेळेत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून दिनांक ६.०६.२००९ व दि. १५.०६.२००९ या दिनांकास स्मरणपत्रे देखील पाठविण्यात आली. दि. १८.०६.२००९ रोजी संबंधीत कार्यालयाने माहिती पाठविल्यानंतर त्याच दिवशी रु.२०/- इतके माहितीशुल्क भरण्याबाबत अर्जदारास कळविले. दिनांक १.०७.२००९ रोजी अर्जदाराने रु.२०/- इतके शुल्क भरणाकरुन माहिती प्राप्त करुन घेतली.

दिनांक २५.०५.२००९ च्या माहिती अर्जातील मुद्दा क्र. (III) (e) याबाबतची माहिती त्यांच्या कार्यालयाकडे नसल्याने व ती माहिती शासन स्तरावरील असल्यामुळे दिनांक १० ऑगस्ट २००९ रोजी कक्ष अधिकारी तथा जन माहिती अधिकारी वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग, मंत्रालय, मुंबई ३२ यांना त्या मुद्याच्या अनुषंगाने माहिती परस्पर अर्जदारास कळवावी असे कळविले.

जन माहिती अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीने समाधान झाले नाही म्हणून दिनांक १६.०७.२००९ रोजी प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याकडे अपील दाखल केले. प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १० ऑगस्ट २००९ च्या आदेशान्वये आदेश पारित करुन दिनांक ४.०८.२००९ रोजी अपीलकर्त्याने सुनावणीच्या वेळी सांगितलेली व त्यांना न मिळालेली कागदपत्रे उपलब्ध करुन द्यावी. जी कागदपत्रे उपलब्ध होणार नाहीत त्याबाबत अपीलकर्त्यास सुस्पष्ट कळवावे. असे जन माहिती अधिकारी यास आदेशित करण्यात आलेले आहेत.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) नुसार दिनांक २०.०१.२०१० रोजी व्दितीय अपील दाखल केले. प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी दिलेल्या आदेशाचे पालन केले नाही म्हणून जन माहिती अधिकारी यांचेवर या अधिनियमाच्या कलम २० अन्वये शास्तीची कारवाई का करण्यात येऊ नये याबाबतचा खुलासा प्रत्यक्ष उपस्थित राहून दिनांक ३०.०३.२०१० रोजी ५.०० वाजता सादर करावा असे आदेश देण्यात आले होते. या अनुषंगाने दिनांक ३०.०३.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त अन्न औषध महाराष्ट्र प्रशासन मुंबई खुलासा सादर केला असूनत्यामध्ये असे नमूद केले आहे अर्जदाराने जी माहिती मागितली होती ती माहिती सहायक संचालक औषध नियत्रण प्रयोगशाळा मुंबई यांचेकडून मागवून घेऊन संबंधीतांना उपलब्ध करुन दिलेली आहे. जी माहिती या कार्यालयाकडे उपलब्ध नव्हती ती माहिती शासन स्तरावरुन अर्जदारास उपलब्ध करुन देण्यास कळविलेले आहे. अर्जदाराने मागितलेली कोणतीही माहिती देण्याचे प्रलंबित नाही त्यामुळे शास्तीची कारवाई करुन नये अशी विनंती केली आहे. त्याबाबत नमूद करण्यात येते की माहिती अर्जात्तील मुद्दा क्रमांक (III) (e) बाबतची माहिती शासन स्तरावरील असल्याचे दिनांक १०.०८.२००९ रोजीच्या पत्रान्वये अर्जदारास कळविलेले आहे. अर्जदाराचा माहितीचा अर्ज २५.०५.२००९ चा आहे. जन माहिती अधिकारी यांनी सदर मुद्याची माहिती मिळविण्याकरीता सदर माहिती अर्जाची प्रत माहिती अधिकार अधिनियम ६ (३) अन्वये पाच दिवसात हस्तांतरीत करणे आवश्यक होती तथापी तशी कार्यवाही

केल्याचे दिसून येत नाही. मुद्दा शासन स्तरावरील मुद्दा वगळता बाकी माहितीबाबत अपीलकाराची तक्रार दिसून येत नाही. शासनाकडे पाठविलेल्या अर्जास का विलंब झाला याचा खुलासा देखील जन माहिती अधिकारी त्याच्या अर्जात केलेला नाही. अर्ज हस्तांतरण करण्यास एकूण ७७ दिवसांचा विलंब झालेला दिसून येतो. यास्तव जन माहिती अधिकारी यांचेवर रु.५०००/- ची शास्ती लावण्यात येत आहे. ती त्यांच्या दि. १ डिसेंबर, २०१० रोजी होणाऱ्या पगारातून वसूल करुन शासनाने विहीत केल्याल्या बजेट हेडमध्ये जमा करावी व तसे केल्याचा अनुपालन अहवाल आयोगास दि. १५ डिसेंबर, २०१० रोजीपर्यंत पाठवावा. वरील कार्यवाही करण्याची जबाबदारी आयुक्त, अन्न व औषध प्रशासन यांचेवर टाकण्यात येत आहे ती त्यांना पार पाडावी.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**
**उपरिनिर्दीष्ट निर्देशाप्रमाणे शास्ती वसुलीची कार्यवाही**
**आयुक्त, अन्न व औषध प्रशासन यांनी करावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: ०१.१०.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपीले.**

**क्रमांक : मुमाआ २००९/४६७४३/अपील. क्रं. ५८३२/०२**

**क्रमांक : मुमाआ २००९/४६७४४/अपील. क्रं. ५८३३/०२**

**श्री. जगदीश टोरपे, ------ अपीलकर्ता**
**२५ ए, टोरपे हाऊस,तेजपाल स्कीम,**
**५ वा रस्ता,विलेपार्ले (पू),**
**मुंबई ४०० ०५७.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा -------- उत्तरवादी**
**सचिव, राज्य माहिती आयोग (बृहन्मुंबई खंडपीठ),**
**१३ वा मजला, नवीन प्रशासकीय इमारत,मादाम कामा रोड,**
**मंत्रालयासमोर, मुंबई- ४०० ०३२**

**जन माहिती अधिकारी**
**कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग (बृहन्मुंबई खंडपीठ),१३ वा मजला,**
**नवीन प्रशासकीय इमारत,मादाम कामा रोड,मंत्रालयासमोर,**
**मुंबई- ४०० ०३२**

**---विवेचन ---**

| | |
|---|---|
| माहिती अर्ज दाखल केल्याचा दिनांक | :- ०३.११.२००९ |
| जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या आदेशाचा दिनांक | :- निरंक |
| प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याकडे दाखल अपीलाचा दिनांक | :- ११.१२.२००९ |
| प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याने पारित केलेल्या आदेशाचा दिनांक | :- निरंक |
| व्दितीय अपील दाखल केल्याचा दिनांक | : -२५.०१.२०१० |
| सुनावणीचा दिनांक | : -२४.०६.२०१० |
| अपीलार्थी | :- उपस्थित |
| जन माहिती अधिकारी | : - उपस्थित |
| प्रथम अपीलीय प्राधिकारी | :- उपस्थित |

विचारणा केलेल्या माहितीचा तपशील : अर्जदारांनी राज्य माहिती आयोगाकडे कलम १८ अन्वये दिनांक ३.०११.२००९ च्या निवेदनान्वये तक्रार दाखल केली आहे. त्यानुसार (अ) तक्रारीत जी माहिती मागितलेली आहे ती माहिती पुरवावी व (ब) दिनांक ३.११.२००९ च्या तक्रारीवर कायदेशीर कारवाई केली असल्यास त्याबाबतची माहिती.

सुनावणीच्या वेळी निदर्शनास आलेली वस्तुस्थिती : ही दोन्ही व्दितीय अपीले ही दिनांक ३.११.२००९ रोजी दिलेल्या एकाच माहिती अर्जाच्या अनुषंगाने दाखल केली असून दोन्ही अपीलांचा मजकूर हा सारखाच आहे. दोन्ही अपीलावर

रु.२०/- चे कोर्ट फी स्टॅप लावले असून त्यांना वेगवेळे जावक क्रमांक देण्यात आले आहेत.त्याचाच परिणाम म्हणून दोन अपीले समजून दोन वेगवेगळया अपील सुनावणी सूचना काढण्यात आल्या आहेत. अपीलार्थी यांनी कलम १८ अन्वये आयोगाच्या कार्यालयात दि. ३.११.२००९ रोजी एक तक्रार अर्ज दाखल केला असून त्याच दिवशी त्यासंदर्भात काही माहिती मागितलेली आहे.अर्जदाराची सदर कृती तर्कसंगत वाटत नाही.

वास्तविक अपीलार्थी यांना एका व्दितीय अपील प्रकरणी ( अपील क्र.२९७०) ज्याची सुनावणी राज्य माहिती आयुक्त (बृहन्मुंबई खंडपीठ) यांच्या कार्यालयाकडून दि. २८.१०.२००९ रोजी आयोजित करण्यात आली होती त्याची सुनावणी सूचना अपीलार्थीस दि.३१.१०.२००९ रोजी म्हणजे सुनावणीच्या दिवसानंतर तीन दिवस उशिराने प्राप्त झाली. या कारणास्तव त्यांनी दिनांक ०३.११.२००८ स्वतःच्या हस्ताक्षरात तारीख नमूद केलेली आहे. जी तक्रार दिलेली आहे ती खर म्हणजे प्रशासकीय स्वरुपाची तक्रार म्हणता येईल. सदर तक्रार निश्चितच कलम १८ अन्वये करणे अभिप्रेत नाही. असे असले तरी सदर निवेदनाची नोंद आयोगातर्फे तक्रार क्रमांक ४५१२४, दिनांक १६.११.२००९ अन्वये घेण्यात आली असून ती राज्य माहिती आयुक्त बृहन्मुंबई यांच्या कार्यालयाकडे पाठविली होती. अपीलार्थी यांनी त्यांच्या सदर तक्रारीमेध्ये मा.राज्य माहिती आयुक्त, श्री रामानंद तिवारी यांच्याविरुध्द आरोप केले असल्यामुळे तसेच ज्या अपील क्र.२९७० संदर्भात सुनावणी सूचना उशिरा मिळाल्याच्या मुद्यावरुन आक्षेप घेण्यात आले आहेत. त्या अपीलावर मा. राज्य माहिती आयुक्तांनी निर्णय पारित करण्याऐवजी ते अपील मा.राज्य मुख्य माहिती आयुक्त म्हणून माझ्याकडे पुढील योग्य त्या निर्णयासाठी दि. ३.०४.२०१० रोजी हस्तांतर केले आहे. सदर हस्तातंतरीत अपीलावर (जूना अपील क्रमांक २९७० ) दि. २५.०६.२०१० रोजी राज्य मुख्य माहिती आयुक्त यांच्यासह राज्य माहिती आयुक्त,बृहन्मुंबई,नागपूर व अमरावती यांच्या एकत्रित पीठासमोर अपील क्रमांक ५८४३ अन्वये सुनावणी आयोजित करण्यात आली. अशाप्रकारे अपीलार्थी यांनी दिनांक ३.११.२००९ रोजी सादर केलेले निवेदन विचारात घेऊनच माझ्यासह आणखीन तीन राज्य माहिती आयुक्तांच्या एकत्रित पीठासमोर सुनावणी आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला.

प्रस्तुत प्रकरणी अपीलार्थी यांनीदिनांक ३.११.२००९ रोजी दिलेल्या तक्रार वजा निवेदनासंबंधी त्याच दिवशी माहिती अर्ज करण्याची कृती ही आयोगाच्या कामकाजात विनाकारण वाढ करणारी अशी आहे.

**आदेश**

**दोन्ही अपीले निकाली काढण्यात येत आहेत.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ०१.१०.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**क्रमांक : मुमाआ २०१०/१६६७/त. क्रं. १०८१/०१**

**श्री. एस.के.नानगिया,** **------ तकारकर्ते**
**७०४, गोल्डन चॅरिष्ट को.ऑ.हौ.सोसायटी,**
**१३३, सेक्टर ६, चारकोप, कांदिवली (प),**
**मुंबई ४०० ०६७**

**विरुध्द**

**१) प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा** **-------- उत्तरवादी**
**कार्यकारी अभियंता-३, झोपडपट्टी पुरर्वसन प्राधिकरण,**
**गृह निर्माण भवन, बांद्रा (पूर्व),**
**मुंबई ४०० ०५१.**

**२) श्री.सु.ज.बेंद्रे,**
**(तत्कालीन) जन माहिती अधिारी - ४,**
**झोपडपट्टी पुरर्वसन प्राधिकरण,**
**गृह निर्माण भवन, बांद्रा (पूर्व),**
**मुंबई ४०० ०५१.**

**३) श्री. संजय रोहिदास निर्मळ,**
**(विद्यमान), जन माहिती अधिारी - ४,**
**झोपडपट्टी पुरर्वसन प्राधिकरण,**
**गृह निर्माण भवन, बांद्रा (पूर्व),**
**मुंबई ४०० ०५१.**

## ---विवेचन ---

सांताक्रुझ (प), मुंबई येथील दौलत नगर येथील १०० फुट विकास नियोजन रस्त्यावर मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाची अवहेलना करुन पाच इमारती बांधण्याबाबत झोपडपट्टी पुरर्वसन प्राधिकरणाने परवानगी दिल्याप्रकरणी वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या बातमीचा आधार घेऊन एकूण ६ मुद्यांबाबत श्री.एस.के.नानगीया, यांनी त्यांच्या दिनांक १२.०३.२०१० च्या अर्जान्वये माहितीच्या अधिकारात माहिती मागितली होती.

सदर अर्जास अनुसुरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ५.०४.२०१० च्या पत्रान्वये कलम २ (च) अन्वये एकीकडे माहितीच्या व्याख्येत मागितलेली माहिती यात नसल्याने नाकारण्यात आली असून दुसरीकडे अर्जदारास संबंधित नस्तीचे निरीक्षण करुन हवी असलेली माहिती प्राप्त करुन घेण्याबाबत कळविले. सदर उत्तराने व्यथित होऊन अर्जदार यांनी दिनांक २६.०४.२०१० रोजी कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी दि. १८.०५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करुन अपीलकारांनी मागितलेली माहिती व कागदपत्रांच्या प्रती आदेश मिळाल्यापासून

१५ दिवसांचे आत सध्याचे जन माहिती अधिकारी यांनी द्याव्यात व अपीलार यांना त्यांच्या सवडीनुसार नस्तीचे निरीक्षण करुन देऊन हवी असलेली माहिती नियमानुसार उपलब्ध करुन देण्याबाबत दिनांक ८.०६.२०१० रोजी आदेश पारित केले.

प्रथम अपीलीय प्राधिकारी यांच्या दिनांक ८.०६.२०१० च्या आदेशानुसार विद्यमान जन माहिती अधिकारी यांजकडून कोणतीही माहिती विहीत कालावधीत प्राप्त न झाल्याने अर्जदार यांनी दि. ६.०७.२०१० रोजी आयोगाकडे कलम १८ (१) अन्वये तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दिनांक २७.०८.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीच्या वेळी तक्रारदार, प्रथम अपीलीय प्राधिकारी तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

सुनावणीच्या वेळी तक्रारदार यांनी निवेदन करुन असे कथन केले की, आयोगाकडे तक्रार दाखल केल्यानंतर त्यांना विद्यमान जन माहिती अधिकारी यांचे दिनांक १०.०६.२०१० रोजीचे पत्र खास दुतामार्फत दिनांक ९.०७.२०१० रोजी म्हणजेच एक महिना विलंबाने प्राप्त झाले. त्यांनी आणखीन असेही कथन केले की जन माहिती अधिकारी यांजकडून एकतर अर्ज केल्यानंतर चार महिन्यानंतर माहिती प्राप्त झाली व ती सुध्दा अपूरी प्राप्त झाली. या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ६.०९.२०१० च्या अहवालात असे नमूद केले आहे की,

" अपीलकारास माहिती पाठविण्यामध्ये झालेल्या दिरंगाईबद्दल या कार्यालयाचे मुख्य लिपिकाने संबंधित माहिती कक्षाच्या लिपिकाकडून जबाब नोंदवून घेतलेला आहे. त्याची प्रत सोबत जोडलेली आहे. यामध्ये संबधित लिपिकाच्या नजरचुकीमुळे कागदपत्र खणामध्ये राहून गेल्याबद्दल लेखी दिलगीरी व्यक्त केलेली आहे.

वरील विवेचनावरुन जन माहिती अधिकारी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये सादर केलेल्या सर्व अर्जास उत्तर दिलेले असून योग्य ती माहिती पुरविण्यात आलेली आहे. अर्जदाराची दिशाभूल करणे अथवा माहिती पुरविण्यामध्ये दिरंगाई करणे असा कुठलाही जन माहिती अधिकारी यांचा उद्देश नसल्याचे दिसून येते. तसेच उपरोक्त संदर्भात अपिलकाराने व्यक्तिशः नस्तीचे निरीक्षण केले असते तर त्यांना आवश्यक असणारी अधिक माहिती त्यामधून प्राप्त होऊ शकली असती. जन माहिती अधिकारी यांना अपिलकारास लेखी स्वरुपात दि. १०.०६.२०१० रोजी प्रथम अपीलीय प्राधिकारी यांच्या आदेशानुसार माहिती दिलेली आहे."

सदर अहवालात नमूद केल्यानुसार ज्या लिपिकाच्या नजरचुकीमुळे तक्रारदार यांना पाठवावयाचे पत्र निर्गमित करण्यास विलंब झालेला आहे त्यांच्या दिनांक १.११.२०१० रोजी होणाऱ्या वेतनातून रु.१०००/- (एक हजार मात्र) इतकी शास्ती वसुल करुन ती शासनाने विहीत केलेल्या लेखाशिर्षाखाली जमा करावी व याबाबतचा पूर्तता अहवाल प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी आयोगास दिनांक १५.११.२०१० पर्यंत चलनाच्या प्रतीसह पाठविण्यात यावा.

तक्रारदार यांनी त्यांच्या मुळ माहिती अर्जात पुढील मुद्यांवर माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी टाळल्याचे दिनांक २७.०८.२०१० च्या निवेदनात नमूद केलेले आहे :-

१) माहिती अर्जातील मुद्दा क्रमांक (ii) - ज्या अधिकाऱ्यांवर न्यायालयीन आदेशाच्या अनुपालनाची जबाबदारी सोपविली होती त्यांची नावे व पदनामे यांची माहिती.

२) माहिती अर्जातील मुद्दा क्रमांक (iii) - मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाचे योग्य व पुर्ण स्वरुपात अनुपालन केल्याबाबत मा. उच्च न्यायालयास अनुपालन अहवाल दाखल केला असल्यास अभिलेखात नमूद केलेल्या त्याबाबतच्या करणांची माहिती,

३) माहिती अर्जातील मुद्दा क्रमांक (iv) - मा.उच्च न्यायालयास मा. सर्वोच्च न्यायालयास दौलतनगर येथील विचारधीन डी.पी.रोड हा अतिक्रमण विरहित असल्याच्या पृष्ठर्थ्य सादर केलेल्या ले आऊट प्लॅनची प्रत,

४) माहिती अर्जातील मुद्दा क्रमांक (v) - अतिक्रमण विरहित क्षेत्र ठेवण्याबाबत मा.न्यायालयाचे आदेश असताना तेथे पाच इमारती बांधण्याची परवानगी ज्या अधिकाऱ्यांनी दिली त्यांची नावे व पदनामे यांची माहिती.

तक्रारदार यांनी देखील त्यांनी मागणी केल्याप्रमाणे संबंधित नस्तीची तपासणी करावी जन माहिती अधिकारी यांनी सुरवातीस मागितलेली माहिती "माहिती "या संज्ञेत येत नाही असे कळविले ते चुकीचे आहे त्याबद्दल त्यांना समज देण्यात येत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**
**संबंधितांनी उपरिनिर्दीष्ट कार्यवाही करावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: ०१.१०.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक : मुमाआ २००९/४५१३२/अपील. क्रं. ५२४६/०२**

**श्री. आर.पी.यजुर्वेदी,** **------ अपीलकर्ता**
**३०२, अ नवआसावरी सोसायटी, १८२ जे बी नगर,**
**अंधेरी पूर्व, मुंबई ४०० ०५९**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा** **-------- उत्तरवादी**
**उप/सह सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय,**
**मुंबई ४०० ०३२**
**जन माहिती अधिकारी**
**अवर सचिव/कक्ष अधिकारी, नगर विकास विभाग, मंत्रालय,**
**मुंबई ४०० ०३२**

**---विवेचन ---**

अपील क्रमांक ५२४६ मधील दिनांक २८.०१.२०१० रोजी दिलेल्या आदेशानुसार अर्जदारास माहिती न दिल्याबद्दलची सुनावणी दिनांक २.०३.२०१० रोजी घेण्यात आली त्या वेळेला म्हाडाचे सहायक व मिळकत व्यवस्थापक यांनी आयोगास असे निवेदन दिले की अर्जदारास अनधिकृत बांधकामाची माहिती पाहिजे आहे तशी माहिती संकलित करण्यात येत नाही. मात्र त्या विशिष्ट जागेबाबतची माहिती हवी असेल तर ती उपलब्ध करुन देता येईल.

याचा अर्थ म्हाडाच्या वसाहतीतील अनधिकृत बांधकामाबाबत लक्ष ठेवणारी कुठचीही नियमित यंत्रणा नाही किंवा असली तरी त्यांच्या कामाचे संकलितरित्या अवलोकन करता येईल अशी नोंदवही नाही ही बाब मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा यांच्या निदर्शनास आणण्यात येत आहे. माहिती उपलब्ध नसल्यामुळे ती देता येणार नाही. त्यामुळे शास्तीचे आदेश नाहीत मात्र अर्जदारास विवक्षित बांधकामाबाबत माहिती पाहिजे असल्यास ती जन माहिती अधिकारी यांच्या निदर्शनास आणावी व त्यांनी ती माहिती द्यावी. शास्तीचे प्रकरण बंद करण्यात येत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: ०१.१०.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक : मुमाआ २००९/४७६५९/अपील. क्रं. ५८३४/०२**

**श्री. संजय एम.पांगम,** **------ अपीलकर्ता**
**हथु निवास, ४०२ बी विंग, २८ X २५, रोड,**
**बांद्रा (प), मुंबई ४०० ०५०.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा** **-------- उत्तरवादी**
**जिल्हा उपनिबंधक, सह संस्था (३), म्हाडा बिल्डींग,**
**तळमजला वांद्रे (पू).**

**जन माहिती अधिकारी**
**सहा निबंधक सहकारी संस्था (३),म्हाडा बिल्डींग,**
**तळमजला वांद्रे (पू).**

**---विवेचन ---**

अपीलाचा दिनांक : ०१.०४.२०१०
सुनावणीचा दिनांक : २४.०६.२०१०
जन माहिती अधिकारी : अनुपस्थित
अपीलार्थी : अनुपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

अपीलार्थींनी दिनांक १७.०२.२०१० च्या माहिती अर्जाव्दारे त्यांनी मुद्दा महा.सहकारी संस्था अधिनियमाच्या कलम १४६ (ई-१) नुसार दाखल केलेल्या तक्रारीवर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मागितला होता. या अर्जाला जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २५.०२.२०१० रोजी उत्तर दिले. यानुसार अपीलार्थींना असे कळविण्यात आले की त्यांचा तक्रार अर्ज उपनिबंधक, सहकारी संस्था, एच (प) विभाग यांना पाठविला आहे. या उत्तराने समाधान न झाल्याने त्यांनी दिनांक ३.०३.२०१० रोजी प्रथम अपील केले प्रथम अपीलावरील निर्णय दिनांक २२.०३.२०१० च्या पत्रान्वये अपीलार्थीस कळविण्यात आला. या निर्णयाने समाधान न झाल्याने त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलावरील सुनावणीच्या वेळी आयोगासमोर दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसून आले की अपीलार्थींना त्यांनी दाखल केलेल्या तक्रारीवर झालेल्या कार्यवाही अहवालाची प्रत हवी आहे. ती त्यांना दिलेली

नाही तेव्हा आयोगाचे असे निदेश आहेत की अपीलार्थींनी केलेल्या तक्रारीवरील कार्यवाही अहवालाची प्रत अपीलार्थींना विनाशुल्क पाच दिवसात पुरविण्यात यावी. तक्रारीवरील कार्यवाही अपूर्ण असल्यास अपीलार्थीस कळविण्यात यावे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: ०४.१०.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक : मुमाआ २००९/४७६५९/अपील. क्रं. ५८३५/०२**

**श्री. संजय एम.पांगम,** **------ अपीलकर्ता**
**हथु निवास, ४०२ बी विंग, २८ X २५, रोड,**
**बांद्रा (प), मुंबई ४०० ०५०.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा** **-------- उत्तरवादी**
**जिल्हा उपनिबंधक, सह संस्था (३), म्हाडा बिल्डींग,**
**तळमजला वांद्रे (पू).**

**जन माहिती अधिकारी**
**सहा निबंधक सहकारी संस्था (३),म्हाडा बिल्डींग,**
**तळमजला वांद्रे (पू).**

**---विवेचन ---**

अपीलाचा दिनांक : ०१.०४.२०१०
सुनावणीचा दिनांक : २४.०६.२०१०
जन माहिती अधिकारी : अनुपस्थित
अपीलार्थी : अनुपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

अपीलार्थींनी दिनांक ११.०१.२०१० च्या उप निबंधकांच्या पत्राच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीच्या अहवालाच्या प्रतीची मागणी केली. परंतु या अर्जाला प्रतिसाद न मिळाल्याने त्यांनी दिनांक १५.०२.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले.

प्रथम अपीलावर दि. ३.०३.२०१० रोजी सुनावणी झाली व दि. ०९.०३.२०१० रोजी त्यावरील निर्णय अपीलार्थींना कळविण्यात आला यानुसार अपीलार्थींना त्यांच्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीबाबत माहिती देण्याचे निदेश देण्यात आले. तथापि अपीलार्थींना माहिती मिळाली नाही. यास्तव त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी सादर कागदपत्रांवरुन असे निदर्शनास आले की अपीलार्थींना त्यांच्या मागणीप्रमाणे कागदपत्रांच्या छायाप्रती मिळालेल्या नाहीत. तेव्हा आयोगाचे असे निदेश आहेत की त्यांना पाच दिवसात उपलब्ध करुन द्याव्यात.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: ०४.१०.२०१०**

**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक : मुमाआ /४६२३७/अपील क्र. ५५४३/०२**

**श्री. एम.पी.भोसले,** **------- अपीलकर्ता**
**५१/११२०, आझाद नगर३, वि.रा.देसाई रोड,**
**अंधेरी (प), मुंबई ४०० ०५८.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**उपनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व),**
**मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहकारी संस्था, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व),**
**मुंबई ४०० ०५१.**

**---विवेचन ---**

प्रस्तुत अपील प्रकरणी माझ्या दिनांक १९.०३.२०१० च्या आदेशान्वये जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आदेश देऊनही अपीलार्थीस मुदतीत माहिती न दिल्याबद्दल त्यांचेवर रुपये १०,०००/-( रुपये दहा हजार मात्र) ची शास्ती लादण्यात आलेली आहे. सदर आदेशास अनुसरुन श्री.पं.वि.डांगरे, जन माहिती अधिकारी तथा सहाकारी अधिकारी श्रेणी -१, सहकारी संस्था, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ, मुंबई यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा, उपनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ, मुंबई यांचे मार्फत आयोगास दि. २१ मे, २०१० रोजी अर्ज सादर केलेला आहे. सदर अर्जाव्दारे माझ्या दि. १९.०३.२०१० च्या आदेशाचे पुर्ननिरीक्षण होऊन फेरआदेश होणेबाबत विनंती केलेली आहे.

प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी दि. ३०.०९.२००९ रोजी प्रथम अपीलावर जे आदेश पारित केलेले आहेत, त्यानुसार पुढील गोष्टी स्पष्ट होतातः

१)	अर्जदार, श्री.भोसले यांच्या दि. २६.०६.२००९ च्या माहिती अर्जास तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दि. ३.०८.२००९ रोजी उत्तर दिलेले आहे.

२)	सदर आदेशाची प्रत श्री.काकड, माहिती अधिकारी तथा सहकारी अधिकारी (प्रथम श्रेणी) उपनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ, मुंबई यांना ज्या अर्थी अग्रेषित केलेली आहे त्याअर्थी तत्कालीन जन माहिती अधिकारी म्हणून श्री.काकड कार्यरत होते.

प्रथम अपीलीय प्राधिकारी यांच्या दिनांक ३०.०९.२००९ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार श्री.बी.एम.काकड यांनी दि. २१.१०.२००९ रोजी अर्जदार श्री.भोसले यांना माहिती दिली असल्याचे जन माहिती अधिकारी श्री.पं.वि.डांगरे यांच्या दि. २१.०५.२०१० च्या निवेदनात नमूद केले आहे.

आयोगाने दि.१९.०३.२०१० च्या आदेशान्वये जी शास्ती लादलेली आहे ती तत्कालीन जन माहिती अधिकारी यांच्या वेतनातून वसुल करणे अभिप्रेत आहे. त्यामुळे श्री.पं.वि.डांगरे हे तत्कालीन जन माहिती अधिकारी नसल्याने त्यांनी आयोगाकडे पुनर्निरीक्षणासाठी अर्ज करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही

प्रस्तुत प्रकरणी तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.बी.एम.काकड यांजकडून रु.१०,०००/- ची शास्ती लावण्यात येत आहे. ती त्यांच्या दि. १ नोव्हेंबर, २०१० व दि. १ डिसेंबर, २०१० रोजी होणाऱ्या पगारातून समप्रमाणात वसूल करुन शासनाने विहीत केल्याल्या लेखाशिर्षाखाली जमा करुन चलनाची प्रत व पुर्तता अहवाल प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ, मुंबई यांनी आयोगास दि. १५ डिसेंबर, २०१० रोजीपर्यंत पाठवावा.

**आदेश**

**अपीलीय अधिकारी यांनी उपरिनिर्दीष्ट कार्यवाही करावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: ०५.१०.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक : मुमाआ २००९/३७७४५/अपील. क्रं. ४०६०/०२**

**श्री. शैलेश आर.घेडीया** ------- **अपीलकर्ता**
**बी/२०२, लाभ आशिष,ओल्ड पोलीस क्वार्टर्स लेन,**
**सहार रोड, अंधेरी (पूर्व),**
**मुंबई ४०० ०६९.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा** -------- **उत्तरवादी**
**संचालक (अभियांत्रिकी सेवा व प्रकल्प),**
**बृहन्मुंबई मनपा मुख्यालय, विस्तार इमारत, ३ रा मजला,**
**महापालिका मार्ग, फोर्ट,**
**मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी**
**उपमुख्य अभियंता (इ. प्र.) शहर**
**बृहन्मुंबई मनपा मुख्यालय, विस्तार इमारत, ३ रा मजला,**
**महापालिका मार्ग, फोर्ट,**
**मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी**
**उपमुख्य अभियंता (इ. प्र.) पश्चिम उपनगरे**
**बृहन्मुंबई मनपा मुख्यालय, विस्तार इमारत, ३ रा मजला,**
**महापालिका मार्ग, फोर्ट,**
**मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी**
**उपमुख्य अभियंता (इ. प्र.) पूर्व उपनगरे,**
**बृहन्मुंबई मनपा मुख्यालय, विस्तार इमारत, ३ रा मजला,**
**महापालिका मार्ग, फोर्ट,**
**मुंबई ४०० ००१**

## ---विवेचन ---

श्रीयुत शैलेश घेडिया यांनी दिनांक ०१.०१.२००९ रोजीच्या पत्राने त्यांचे जुने अपील व त्यासंदर्भात पाठविलेले पेपर्स आयोगास पाठविले होते. त्या अपीलाची सुनावणी दिनांक १९.०३.२००९ रोजी घेण्यात आली त्यावेळेला अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अर्जदाराने ज्या इमारतींना ऑक्युपेशन सर्टिफीकेट देण्यात आलेले होते त्यासंदर्भात सांखिकी माहिती व ऑक्युपेशन सर्टिफीकेट न देण्याची सर्वसाधारण कारणे वगैरे माहिती पाहिजे होती व ही माहिती गोळा करण्यासाठी फार मोठया

प्रमाणावर मनुष्यबळ वळवावे लागणार असल्यामुळे ती माहिती नाकारण्यात आली होती. सुनावणीच्या वेळी माहिती का देण्यात यावी याबद्दल पुढीलप्रमाणे कारणे अर्जदाराने दिले कारणे दिली होती.

1. Information asked for is statistical and is not at all voluminors information. Reasons asked for pending O.C. are of General nature. Providing information, will not burden dept., since dept. is expected to have this information readily available. Information sought will not divert the resources of dept.
2. It is understood that, The moment C.C. is applied, whole procedure of sanctions etc is started., is recorded inRegister,till O.C. & B.C.C. is finally issued to the bldg.
3. The information restricted to specific information only after direction in order passed by Mr. Vishwanathan, Director (Engg Services & Profects) vide his letter dt Dir?ES&P/236/RTI dt 9.10.2006 in Appeal under Act.
4. Information asked at sr no 2&3, is in consonance with sec 2 (f) of RTI Act., since information asked pertains to circulars, etc.is within meaning of INFORMATION u/s 2 (f) of Act.

ही कारणे सयुक्तिक वाटतात अर्जदारास सांखिकी माहिती पाहिजे आहे. प्रत्येक नस्तीची माहिती नको असल्यामुळे अशा पध्दतीची माहिती महापालिकेस सुध्दा उपयुक्त ठरणार असल्यामुळे वरील माहिती ही दोन महिन्याच्या कालावधीत देण्यात यावी अशी सर्व संबंधित चर्चा करुन ठरविण्यात आले होते व तसे निर्देश देण्यात आले होते.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**
**संबंधितांनी वरील निर्देशाचे पालन करावे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: ०८.१०.२०१०**